राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ :- २३६८ / २०२२ / कोल्हापूर

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| जवाहरलाल आप्पासाहेब रोटे | नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय करवीर, ता . करवीर, जिकोल्हापूर . | तहसिलदार, तहसिल कार्यालय करवीर, ता . करवीर, जि. कोल्हापूर , |

( सुनावणी दिनांक -८/१/२०२५ व १८ /०२ /२०२५ )

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचे कडे दि. १९.०३.२०२२ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. व्दितीय अपील दाखल करतांना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानूसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, विद्यमान व तत्कालीन जन माहिती अधिकारी तसेच विद्यमान व तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपीलार्थी यांनी दि. २१.०२.२०२२ च्या माहिती अर्जात मौजे चिंचवड ता करवीर जि कोल्हापूर येथील गट नं १०५ बद्दलची माहिती मागितलेली आहे.

अपिलार्थीचे लेखी निवेदन नोंदणीकृत डाकेने आयोगास प्राप्त असून त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, वय ८३ असल्याने प्रकृती ठीक नसल्याने हजर राहता येणे अशक्य आहे. मागणीनुसार माहिती पुरविण्याचे आदेश देण्यात यावेत, अशी मागणी केली आहे. सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>आदेश</u>

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय करवीर, ता. करवीर, जि. कोल्हापूर यांनी अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र "अ" मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व विहीत तरतूदीनूसार देय होणारी ५० पृष्ठांपर्यंतची माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसांचे आत अपिलार्थीस विनामुल्य उपलब्ध करून द्यावी. अपिलार्थीस ५० पेक्षा

अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करून द्यावी. जी माहिती देत येत नाही, त्याचे कारण नमूद करुन अपिलार्थीस कळवावे. सदर आदेशाची अंमलबजावणी संबधित अधिकारी यांनी विहिती कालावधीत करावी अन्यथा त्यांच्यावर नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसिल कार्यालय करवीर, ता. करवीर, जि. कोल्हापूर यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशांसह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र
सत्यमेव जयते
पुणे खंडपीठ

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र. २३६८ / २०२२ / कोल्हापूर / 7336/2025 दिनांक - 6/3/2025